# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२— २५५७२६६

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website : rdtenagpur.org.in**

महत्वाचे

क्रमांक : तंशिस/विकाना/डीबीटी—पोर्टल/ २०१९/ 2421

दि. 7 AUG 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पदवी /पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या
विभागिय कार्यालयाचे अधिनस्त
येणा—या सर्व संस्था.
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजना राबविण्यांबाबतचे वेळापत्रक .

संदर्भ :— मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/ डीबीटी—पोर्टल/२०१९/३७१, दि. ०५/०८/२०१९.

सन २०१८—१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय, (डी.आय.टी) यांचेकडून , महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ:—**https://mahadbtmahait.gov.in** ) बनविण्यांत आलेले असून त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येणाऱ्या खालील योजनांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग—१ वैद्यकीस अभ्यासक्रम वगळून)

त्या अनुषंगाने या विभागातंर्गत येणाऱ्या सर्व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपरोक्त योजनांच्या सन २०१९—२० च्या अंमलबजावणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या व सोबत जोडलेल्या संदर्भीय पत्राद्वारे दिलेल्या वेळापत्रकानुसार खालीलप्रमाणे आवश्यक ती संबंधित कार्यवाही करण्यांबाबत सूचित करण्यांत येत आहे.

१. महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेल्या सर्व संस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या पोर्टलबाबतच्या लॉगीन क्रिडेन्शिअल्सचा वापर करुन संस्थेची अचूक माहिती (जसे संस्थेचे प्रोफाईल, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांना लागू असलेले सर्व शुल्क व परीक्षा शुल्क इ. ) ऑनलाईनरित्या अद्यावत करुन या कार्यालयाकडे मंजूरीसाठी वेळापत्रकात दिलेल्या अंतिम तारखेपूर्वी मंजूरीसाठी ऑन लाईनरित्या पाठवून मंजूर करुन घ्यावे.
२. सर्व संस्थांनी दर्शनी भागावर नोटीस लावून संस्थांमध्ये शिकणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना डी.बी.टी.पोर्टल (संकेतस्थळ:— **https://mahadbtmahait.gov.in** ) वर सन २०१९—२० साठी अर्ज अंतिम दिनांकपर्यत न थांबता लवकरात लवकर भरण्यांबाबत कळविण्यांत यावे. तसेच पोर्टलवर योजनेकरीता अर्ज भरण्यांबाबत विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र संगणक कक्ष उपलब्ध करुन देण्यांत यावा व संस्थांनी योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी संबंधित लागू असलेल्या योजनेसाठी अर्ज करण्यांपासून वंचित राहाणार नाही याबाबत संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: दक्षता घ्यावी.

३. संस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या डी.बी.टी.पोर्टल च्या लॉगीन क्रिडेन्शिअल्सचा (क्लार्क व प्राचार्य) वापर करुन संबंधित योजनेच्या प्राप्त झालेले अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित न ठेवता संबंधित योजनांच्या शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीनुसार तपासून ,पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठवावे. तसेच विद्यार्थ्यांना केलेल्या अर्जामध्ये काही त्रूटीच्या दुरुस्ती असल्यास संस्थेकडून विद्यार्थ्यांकडे ऑनलाईनरित्या परत पाठविण्यांत आलेले अर्ज विद्यार्थ्यांकडून अंतिम दिनांकपर्यंत न थांबता पुन्हा योग्य त्या दुरुस्तीसह या कार्यालयाकडे ऑनलाईन मंजूरीकरिता पाठवावे.

वरिल प्रमाणे संस्थेने विद्यार्थ्यांकडून संबंधित योजनांचे अर्ज भरुन त्यांवर योग्य ती कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजनांपासून वंचित राहणार नाही याची सर्व संस्थाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

( डॉ.सी.एस.थोरात )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

Schedule Plan for MahaDBT Portal of Post Matric Scheme for Academic Year 2019-20

| Sr. No. | Module | Start Date | End Date |
|---|---|---|---|
| 1 | Institute Profile Update and Approval by FRA/ SSS/ Dept. | 19th June 2019 | 5th August 2019 |
| 2 | Application Acceptance AY 19-20 for Merit Schemes | 1st August 2019 | 31st August 2019 |
| 3 | Application Acceptance other than Merit Schemes AY 19-20 | 1st August 2019 | 10th October 2019 |
| 4 | Institute Scrutiny for Merit Schemes | 1st August 2019 | 16th September 2019 |
| 5 | Department Scrutiny for Merit Schemes | 1st August 2019 | 23rd September 2019 |
| 6 | Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment | 1st August 2019 | 23rd October 2019 |
| 7 | Department Scrutiny for Other Schemes - 1st Instalment | 1st August 2019 | 31st October 2019 |
| 8 | Start of Non Merit Scheme Allotments | 16th August 2019 | |
| 9 | Allotment of Merit Schemes | 25th September 2019 | |
| 10 | Institute Scrutiny 2nd Installment | 16th November 2019 | 25th January 2020 |
| 11 | Bill generation for DDOs | 16th August 2019 | 31st January 2020 |